# वसा

दिवाळी 2020

वर्ष ७८ | ₹३००

घेऊन हिरवे गाणे
अन चोचीत नवे उखाणे
भेदून तम विनाशकारी
तू घे ना भरारी...



# अनुक्रम

## दीर्घकथा


- एका हस्तलिखिताचं नष्टचर्य आणि अमरत्व
  **सूरज कोल्हापुरे** २०


## कथा


- कुशिम अर्थात अपचन पुराणः
  निमित्त मालपानीचा नवरा
  **मीनाक्षी पाटील** ४२
- मरणाच्या गोष्टी
  **जयंत पवार** ७६
- फोक्शाचा नो बॉल आणि पोलार्डची अर्धी इनिंग
  **विवेक कुडू** ११८
- नदीचा तिसरा किनारा
  **मूळ लेखकः जुआउं गिमाराएस होसा**
  **अनुवादः शैलेश जोशी** १३८
- वुहानचा वाफारा
  **विजय तांबे** १५२


## कविता


- **श्रीकांत ढेरंगे** १००
- **कविता मोरवणकर** १७४


## व्यक्तिचित्र


- गेल ऑम्व्हेट, माझी सखी
  **डॉ. भारत पाटणकर** ६


## विशेष विभागः राजकारणापल्याडचा चीन



- चीनः ईर्षा असलेला स्पर्धक शेजारी
  **टेकचंद सोनावणे** ५२
- गाओः चीनचा 'नोबेल' म्हातारा
  **हृषीकेश पाळंदे** ६२
- पोलादी पडद्याआडचे पर्यावरण
  **भावेश ब्राह्मणकर** ६८


## कोरोना विशेष


- क्या धोया क्या पाया?
  **प्रसाद कुमठेकर** १०६
- भटक्या वाटांवरचा कोरोना लॉकडाऊन
  **सई पवार** ११२



| संपादक | प्रकाशक | मुखपृष्ठ रचना |
|---|---|---|
| **संध्या नरे-पवार** | **प्रभाकर नारकर** | **चंद्रकांत गणाचार्य** |
| सर्व कथांची रेखाचित्रे | व्यवस्थापकीय सहाय्य | मांडणी सजावट |
| **सई पवार** | **प्रफुल्लता दळवी** | **ईशा आर्ट्स** |





# फोक्शाचा नो बॉल आणि पोलार्डची अर्धी इनिंग

विवेक वसंत कुडू

‘काय खेलतयं पोलार्ड वरावर सिक्स मारतयं जवरदस्त ताकद

मागचे आठवडेन एका ओवरला चोवीस पायजे होत्या. समोर पोलार्डला पावून वॉलरची फाटली. दोन नोवॉल पडलं. याजून ज्याम धावा रपटवल्या. तीनेक सीक्स मारलं मॅच जिकवली.

ओठ पुडं काडून रवका मारतयं बॉल डायरेक्ट अल्लामत फेकून देतयं. मावा खाल्ल्यावं याला जाम ताकद येतयं. दर ओव्हरीवं एक मावा गपकन तोंडन टाकतयं.

एकदा पार्टीला वसला का, सहाक वियर लागतनं. एक कोंबडी आख्खी ओपन्या करतयं. हाडांचापन चकनाचूर करतयं. लोखा याला खेलाय घेतनं, पन पार्टी असली का कल्टवतनं.

याला पॅकर्स म्हणून नेयाला लोखा बावरतन.

त्याचा जवडा ना ओठ फार मोठं हान, यो वारीक असताना याला गायचे सडाला झुंववलावा वाटतं.’

मांडवातल्या मागच्या खुर्च्यावर पाचसहा पोरं बसली होती. ती हे सर्व बोलत होती. शेवटच्या वाक्यावर सगळे आतल्या आत पण बिनधास्त हसले. एका तरुण मुलाचं बारावं सुरू होतं. लग्न झालेल्या तरुणाचा अपघात आहे की त्याने आत्महत्या केली आहे, हा मुद्दा बारा दिवसात बाजूला पडला आहे. कोणतीच आंतरराष्ट्रीय मॅच सुरू नाही आणि वेस्टइंडिज बरोबर तर नाहीच नाही. आयपीएलही नाही. मग हे कोणत्या पोलार्ड बद्दल बोलत आहेत. हा तर गावतालुकापातळीवर खेळल्या जाणा-या लीग मधला एक पोलार्ड आहे. अनेक गोष्टींचं लोण सर्वदूर पसरतं. चांदणीची जाळीदार रिबीन मुलींच्या केसांपर्यंत जाऊन पोहाचली. आमिरची बोकुड दाढी सगळयांनी ठेवून झाली. आता फाटक्या पॅण्टही आल्या आहेत. क्रिकेटचं वेड तर सर्वांना पहिल्यापासून आहेच. आयपीएलचाही परिणाम झाला आहे. इव्हेंटच्या प्रेमात सगळेच पडले आहेत. सीपीएल म्हणजे छत्रपती प्रिमयर लीग, जातीनिहाय प्रिमियर लीग, पंचक्रोशीनिहाय लीग, शेठनिहाय लीग, राजकारणीनिहाय लीग अशा अनेक लीग आजूबाजूला जन्माला आल्या आहेत. एपीएल, बीपीएल, एसपीएल, केपीएल, जेपीएल. सगळं अगदी आयपीएल सारखंच. अनेक व्यावसायिक संघमालक झालेत. बाहुबली इलेवन, गब्बर फायटर्स, एके टायगर, चामुंडा सिक्सर, बजरंगी रॉक्स, गावदेवी प्रसन्न, माही हेलिकाफ्टर, सिक्स सिक्स युवराज अशा अनेक संघात खेळाडूंची निवड झाली आहे. तरुणांचा आसमंत सगळा लीगने भरून गेला आहे.चांगल्या खेळणाऱ्या खेळाडूंना पैसे देऊन पॅकर्स म्हणून गावोगाव घेऊन जात आहेत.

पोलार्ड हा एक विवाहित मुलगा. त्याच्या तनामनात क्रिकेट भरलेलं आहे. त्याच्या डोक्यात तीनच गोष्टी : समोर आलेला बॉल कसा मारायचा, पत्ते खेळायचे आणि दाबून खायचं प्यायचं. पोलार्डचं लग्न होऊन बायको आली खरी, पण ती थांबली नाही. ती याच्या क्रिकेट प्रेमहोमात वर्षादीडवर्षात आपल्या घरी गेली. या गावात आधीच पिण्याच्या पाण्याचे वांदे, कोणी पोरी दयायला आपली आहुती का दयावी. याला सोडण्याचे एवढेच कारण नसावे. तो कमवायचा त्यापेक्षा जास्त खायचा. साध्या साध्या सामन्यांना त्याला बोलावणं यायचं. सिझन असे तोवर थोडे पैसे आणायचा. पावसाळा सगळा घरात लोळून नाहीतर पत्ते खेळून काढायचा. असले तर पैसे भरपूर नसले तर घंटा. घरात किराणा तर लागतोच. लग्न झाल्यावर बायकोला घरातून एकेक वस्तू गायब होताना दिसली. त्याची नजर अखेर तिच्या मंगळसुत्राकडे गेली, तेव्हा ती पोर हादरून गेली. पोलार्डला आपल्या आई व्यतिरिक्त कुणी नव्हतं. आई त्याच्यावर जीवापाड प्रेम करायची आणि करते. तीही आता खूप थकली आहे. त्याचा एक मित्र आहे. त्याचं नाव फोक्शा.

फोक्शा बकऱ्याच्या मचाणावर बसून कुणाशी तरी बोलतोय. तो कुणाशी बोलतोय? तो एका बकऱ्याला गोंजारतोय. 'काय तुझे केस ना काय तुझी कट आपल्याना जाम आवडतयं आपन एकदा तरी तुला बॉलिंग टाकणार माजे बॉलिंगवर तू फटकं मारून दाखव तुझी दांडी उडवनार. आपण तुलाच का थेंगडा ना बोरीचा पाला जास्त भरवता. कारण आपल्याला तू जाम आवडतंस. आपन बॉलर हाव पण आपल्याला बॅटमन आवडतन. पन आपल्या जवल कॉन्फिडन्स नाय. शेवटलास आपली गाडी गचकतयं.'

हा फोक्शा बकऱ्याबरोबर बोलतोय. 'हाय भजी मला आवडतयं उडी तुजी आपन पन मुथय्या मुरलीधरन होनार ये माज्या काल्या मुरल्या'.

ही मचाण बांधून दिली आहे फोक्शाला त्याच्या बापानं. फोक्शाचा बाप चिंताग्रस्त आणि चिडचिडा आहे. त्याला फोक्शाची खूप चिंता सतावतेय. अर्थात कोणत्या बापाला ती सतावत नसणार? त्याच्या बापाला असं सतत वाटत असतं की आपण नाही पन पोरगा सेट झाला पाहिजे. त्याच्या जवळ पैसा आला पाहिजे. त्याची जमीन त्याला मिळाली पाहिजे. फोक्शाच्या बापाने फोक्शा सेटल व्हावा म्हणून अनेक प्रयत्न केले. बापाने फोक्शाला दिलेला हा बकऱ्या पाळण्याचा चौथा पाचवा व्यवसाय असावा. फोक्शालाच कळत नाही आपल्याला नक्की काय करायचं आहे.

प्रयत्न पहिला : तालुक्याच्या गावी औद्योगिक कंपन्या होत्या. पोरगा कंपनीत कामाला लागून बरेच वर्ष तिथे चिकटून राहिला तर तो कंपनीत परमनन्ट होईल, असा त्याचा विचार. फोक्शा कामाला जाऊ लागला. गाव ते शहर बसचा प्रवास आणि बहिणीने केलेला डबा यांचा खर्च याच्यात फारसं काही परवडण्यासारखं नव्हतं. कंपनीत याच्या सोबत काही मुलं होती. गावाकडे दहावीला ऐंशी टक्के मिळवलेला नथू होता. एक शहरातल्या झोपडपट्टीतला बिरजू होता. एक अतिशय कडक शिस्तीची सुपरवायझर होती. सकाळी नऊ वाजता आत घुसल्यानंतर डायरेक्ट सात वाजता बाहेर पडणं त्याला जिवावर यायला लागलं. औषधांच्या वासात तो गुदमरून जायचा. त्याला जे एप्रन दिलं होतं ते पोतेऱ्यापेक्षा घाणेरडं होतं. त्या औषधांचा वास फोक्शा घरी आल्यावरही जायचा नाही. बसमध्ये याच्या जवळ शक्यतो कुणी बसत नसे. औषधांच्या अंथरूणावर झोपलोय की काय असा त्याला भास व्हायचा. एकेदिवशी हा न सांगताच कंपनीतून निघून आला. फोक्शाचा महिन्याचा पगार घरपोच पाठविण्यात आला.

प्रयत्न दुसरा : बापाला वाटलं की पोराला चिकन सेंटर उघडून देऊ. बापानं एका खारीवाल्याकडून एक जुना तराजू विकत घेतला. दुपार दुपार वाण्याच्या दुकानात जाऊन चिंधुकडयात दगडं बांधून त्यांची वजनं बनवली. नदीच्या पल्याड जाऊन एका वारली माणसाकडून कोसबाचा टेपरा घेऊन आला. चिंचेखाली दोन खुटं गाडून त्यावर फळी ठोकली. लोहाराकडे जाऊन चिकन खांडायचा सुरा आणला. अशी सगळी तयारी असतानाच चिंचेच्या अगोदरच्या घराच्या अंगणात सोमनाथनं चिकनचं दुकान टाकलं. दोघांचीही दुकानं सुरू झाली. फोक्शाला कोंबडीच्या गळयावर सुरा फिरवून तिला तसंच डब्यात सोडून देणं आणि फडफडणं ऐकणं फार जिवावर यायचं. त्यात तिच्या पंखाचं एखादं हाड हमखास बाहेर आलेलं. ती रक्ताळलेली कोंबडी सगळंच फोक्शाच्या जिवावर. तो कोंबडया मारायला कधी कधी पोलार्डला बोलवायचा. नवं नवं दुकान मस्तच चाललं पण सोमनाथच्या आईनं सगळी गिऱ्हाइकं आपल्याकडं वळविल्यानं फोक्शाच्या दुकानात दिवसभरात एखाद दोन कोंबडीच मारली जायची. संध्याकाळी बरेचदा एखादं पेचकट फोक्शाच्या अंगावरच पडायचं. बाप अतिशय चुकचुकत ते शिजवायचा. अखेर सोमानाथचं तरी भलं व्हावं या हेतूने फोक्शानं कोसबाचा ओंडका आडवा पाडला आणि घराच्या अंगणात ढकलत ढकलत आणला.

प्रयत्न तिसरा : तोवर फोक्शाला क्रिकेटची जबर आवड लागली होती. बापाला वाटू लागलं की, गावात एकच लेडीज टेलर, तिच्याकडं अनेक लोकांचे कपडे पेंडिंग. आपला पोरगा जर टेलर झाला तर

शर्टापासून ब्लाऊजपर्यंत सगळं शिवेल आणि चांगली कमाई करेल. फोक्शाचं काहीही न ऐकता त्याचा टेलरिंग क्लासला नंबर घातला. फारसं कुणाला न सांगता, मनावर आणि छातीवर दगड ठेवून फोक्शा डमडम पकडून क्लासला जाऊ लागला. स्पिन करणाऱ्या हातात पितळी कातर आली. स्पिन आणि कातरीचं कराकराव कापणं, याचा काही मेळ बसेना. बापाच्या आग्रहाखातर त्याने खांदयावर मेजरटेप टाकली. फोक्शा क्लासला जाऊ लागला. त्यात सगळया पोरी आणि बाया. त्यात तो अवघडला. ग्राउंडवरची बाराची टीम आणि ही साडेतीन ते सहाची लेडिज टीम. गली, मीडऑफ, बाईज या शब्दांऐवजी त्याच्या मनात आता टक्स, बाबीन, अस्तर हे शब्द घोळायला लागले. हळुहळू पट्टयापट्टयांची चड्डी, झबलं, टोपलं, परकर शिवायला तो शिकला. पुढं याची गाडी कटोरी ब्लाऊजपर्यंत जाऊन पोहचली खरी. पण बायांचं



माप कसं घ्यावं या भितीनं अडली. अखेर त्याने पायडल बंद केलं. अस्तरचं शिवलेलं एकच ब्लाऊज त्याच वहीत बंद केलं. बापानं डोक्यात मारलेली शिवणक्लासची शिलाई पुन्हा काढून टाकली.

पोरा पोरा सेटल हो. कमवायला लाग. तुला डुकरा आणून देव का तुला कोसबाडी कोंबडया आणून देव का अखेर बापाच्या मनात आलं की बकऱ्याचं मटण आता चारशे साठ रूपये किलोपर्यंत आलं आहे. तर आपण बकऱ्या पाळूया. शेवटी शेतावर एक शेड बनवली. एक मचाण बनवलं. बारा बकऱ्या आणल्या. फोक्शा म्हणाला ठीक आहे, टीम सांभाळायची, काहीच हरकत नाही. फोक्शा आणि बकऱ्या यांची दोस्ती झाली. मुलांनी याची खेचायला सुरूवात केलीच. फोक्शा बेबे बेबे फोक्शा जसं ऐकून घ्यायचा तसं त्याने ऐकून घेतलं. फोक्शाने त्यातल्या बऱ्याच बकऱ्यांना क्रिकेटरची नावं ठेवली, सगळया बोकुडांना बॉलरची नावं. त्यात एक ऑप्शन विराट आणि सगळया माद्यांना बॅट्मनची नावं त्यात एक ऑप्शन हरभजन. त्यांना घेऊन तो डोंगरीत जायचा. सुकलेले निवडुंग, बोरीचा पाला काढून घालायचा. बाप तर बकऱ्याची एकही लेंडी वाया घालावायला तयार नाही. घरासाठी विटा पाडणारे लोकं विटा भाजायला, भट्टीत घालायला लेंडया नेतात. फोक्शा संध्याकाळी लेंडया काढायचा. या बुमराला, विराटला, धवनला नंतर कापायला पाठवलं जाईल याचं त्याला फार दुःख व्हायचं. विराटची फार काळजी घ्यायचा फोक्शा. त्याच्या डोक्यापाठीवरून हात फिरवायचा. तो विराटशी बोलायचा, 'विराट तुला मी देतो त्यास पानी पिवां लागल. आमचे गावन पान्याचं वादं हान. असा सांगतन का तू सहाशे रुपये लीटरचा माग पानी पितस. साल्या कसा दिसतोस रं तू. काचेरं गोटी सारखं तुज डोलं. एकदम मादक. तू माझ्यासारखा फोक्शा नाय मिलनं तू तसा असतास त मी तरी तुजा नाव क्याला घेतू.'

आई नसलेल्या मुलाला पोशा म्हणतात माहीत आहे पण याचं नाव फोक्शा का? फोक्शाचं ऐन वेळेवर माती खाणं हे नाव पडण्यास कारणीभूत ठरलं. फोक्शाला दिलेल्या कामाचा अख्खा हत्ती घुसायचा पण शेपटीच्या केसांना असा ओंडका चिकटायचा की हत्ती अधवर्टच, ना आत ना बाहेर. लहानपणी हगायला जायचा तर चुकून ढेकळाच्या खाचरात बसला तर टमरेल लास्ट मोमेंटला पडायचं. एकदा गावातले सगळे ससे खोडायला गेले. वाघुर मांडली. जिथं ससा चुकूनही येणार नाही अशा ठिकाणी फोक्शाला ठेवलं. गावकरी ससा खोडत खोडत वाघुरापर्यंत आले. ससा बरोबर फोक्शाच्या जवळ जाळीत येऊन थांबला. फोक्शाला जराही अंदाज नाही की तो ससा असेल म्हणून. तरीही त्याने उपट घातली. फोक्शाच्या ढेल्यातून ससा पसार. मग फोक्शा सशाच्या मागे पळाला. सशाचे केस एका निवडुंगाला चिकटले होते. फोक्शा ते केस घेऊन आला. एकजण म्हणाला, 'हे केस तलून खायचं का भुज्जून खायचं?' मग सगळे म्हणाले, 'शापूस फोक्शा कसा रं तू?' आपल्या हातून ससा मेला नाही याचे फोक्शाला मात्र थोडं समाधान झाले.

फोक्शा कधीच त्या पोरीच्या वाटयाला गेला नाही. एकदा नदीतून दगड समजून जाळं उचलल्याने चौदा ते पंधरा किलोची खाजरी याला तिचा तांबडा पिसोरा दाखवून पसार झाली. तेव्हाही बाकीचे जाळं ओढणारे त्याला म्हणाले, 'खाजरी हगून गेली ना तुझ्या हातावं. शापूस रं कसा तू' या सगळयामुळे फोक्शा सातत्याने भीतिच्या सावटाखाली असायचा. लहानपणापासून त्याच्याकडून ज्या चुका घडत गेल्या, त्यावर अनेकांची बोलणी. त्यात जास्त करून बापाची. त्यामुळे भितीची गोचीड त्याच्या मनाच्या जांघेत जाऊन बसली. जेव्हा जेव्हा निर्णायक क्षण यायचा त्याचवेळी बरोबर ही गोचीड त्याला चावायची आणि घात व्हायचा. असं सगळं असतानाही फोक्शानं अतिशय मेहनतीनं थोडासा कॉन्फिडन्स कमावला. परंतु कधीकधी तोही मान टाकायचा.

फोक्शाला मित्र भेटले तेही सुमारच. त्यातला एक सतत चिंतेत असायचा. बस मिळेल का? आज बाई येतील का? या एवढया मुलांना नोक-या बायका नवरे मिळतील का? अशीच जर आबादी वाढत राहिली तर अधांतरी असलेली पृथ्वी खाली पडेल का? त्याच्या मनात चिंतांच्या कळया सतत यायच्या आणि पिकून फुटायच्या. फोक्शाचा दुसरा मित्र तो सदैव दोन टोकांवर बसलेला असायचा. सर पेपर चांगला तपासतील किंवा कदाचित कठीणही तपासतील. मी पास नक्की होईन कदाचित नापासही होईन. ती हो सांगेल कदाचित नाही देखील सांगेल. आपल्याला नोकरी लागेल कदाचित लागणार नाही. शिकून फायदा आहे आणि फायदा नाहीही. कदाचित वीसापैकी अकरा देतील कदाचित देणारही नाही. या दोन्ही मिश्रणातून फोक्श्याचं मन बिथरलं आणि बापाचा नकार यातून त्याचं उच्च शिक्षण थांबलं. कारल्याच्या मांडवाला सपोर्ट म्हणून जसे धीरे लावतात तसा तो बापाच्या हरेक कामाचा नाखुषीने धिऱ्या बनला. मांडव कोलमडू नये म्हणून बाप त्याला पुन्हा जमिनीत ठोकू लागला.

मधल्या काळांत त्याने बापाकडे हट्ट केला. 'आप्पा, माना कॉलेज करायचा हाय.'

'कॉलेज करून कोन्चा भला झालाय? तू घरा रेऊनस सेटल हो.'

'आप्पा माना सिझन खेलाया पाठव.'

'आपल्याला परवडणार नी. शेत भात कापणी झोडणी यास आपला भारी.'

'जमीन आपले नावावं करायची हाय, म्हणून माजा अवडा आटापिटा चाललाय. पैशं तं जमवावं लागतीन ना. त्यान दोन बयनीसची लग्नापन करायची हान.'

'अरं बाबा तू सेटल झालास का तुजा लगेच लगीन लावून देयाचा हाय. गावनचा अनंता आल्ता, आपले पक्षामध्ये काम कराया पोराला पाठव. मीन शाप नकार दिला. त्याला सांग्ला लोखांचं काय शिव्या शाप खायाचं हान का. दोन तीन पोरा मोबाइलवर कामाला ठेवलेन. आमी सांगताव तवडास करायचा. मी सांग्ला त्याला, हट, माजे पोराला तुमचे पार्टीन तं नाय पाठवणार.'

याच दरम्यान फोक्शा गावातल्याच एका पोरीच्या प्रेमात पडला. पार्टी तगडी होती आणि मुलगी दिसायलाही सुंदर. पोलार्डचं म्हणनं असं की तुला प्रेम करायला काय जातयं. फोक्शा तिच्यावर प्रेम करू लागला. तिच्या घराकडे सातत्याने पाहणे, तिला फक्त पाहणे, हेच त्याचं प्रेम. तिला बारावीच्या शुभेच्छा देताना हा कांग्रेज्युलेशन असं बोलला. फोक्शा चार पाच दिवस अस्वस्थ होता. तिला बेस्ट ऑफ लकही सांगता आलं नाही. या प्रेमाची अखेर जशी होती तशीच झाली. तिला एका श्रीमंत घरात आणि कर्तबगार मुलाला दिलं. फोक्शा तिच्या काळजाच्या शंभराव्या कोपऱ्यात नसेल. फोक्शाने त्या दिवशी पोलार्ड सोबत ताडी पिली. ताडी फार दिवसांची होती. फोक्शाने तिच्या विषयीचा साचलेला मळ अख्खा बाहेर काढला.

आता फोक्शा तिशीचा झाला असावा आणि त्याच्या बहिणी पंचवीस सव्वीसच्या. त्यातील एक मामाकडे असते. तसं गावाकडे लवकर जमवाजमव होते. पण अजून बरा वर पाहिजे या बापाच्या इच्छेपायी त्या अजून राहिल्या. त्यांच्या अगोदर फोक्शाचं लग्न अशक्य. गावातली मुलं एकत्र जमली की बोलायची, 'याचा बाप बहुतेक तिघांचा एकास मांडवन लावून देल असा वाटतयं. पन आपले जातीन तीन एकस मांडवन करीत नाय. फोक्शा तू पलून जाऊन लगीन कर. का विराट बरोबर लगीन करतंस? अरं सवताच्या स्टंबाची सोय कर त्याला बोच काड हक्काची विकेट घे ये पीचवं खेलतस ते पीचवं कवा खेलशील?' फोक्शा सगळं ऐकून घ्यायचा. पण मनातल्या मनात तो बोलायचा, भोसडीच्यांदो लगीन करून तुमी काय दिवं लावलं

फोक्शा हा उत्तम बॉलर होता. तो लेग स्पीन चांगला करायचा. शेन वार्न आणि मुथय्या मुरलीधरन यांची बॉलिंग बघायची संधी मिळाली तर तो सोडायचा नाही. त्याचे मित्र आता त्याला युटयूबवर ते दाखवायचे. आता डाटा महागला. रिचार्ज करणं परवडणासं झालयं त्यामुळे त्यांचेच वांदे झाले. घरच्या आणि शेताच्या कामातून फोक्शा वेळ काढून खेळायला पळायचा. पण बापासोबत गवंडी कामावर, एखादयाच्या शेतावर जर गेला तर त्याचा जीव खालीवर व्हायचा. फोक्शा तशी पडेल ती कामं करायचां. तारा पिळणं, पिंप धुणं, भात झोडणं, शेतातलं दगड उचलून बांधावर फेकणं, भात पेरणं, स्क्रू काढणं ठोकणं अशी काम त्याला आवडायची कारण यात त्याच्या हातांना पिळदार काम मिळायचं. कधी कधी फोक्शा एखादी चौकशी करीत असेल तर त्याचा हात स्पीन व्हायचा. एकदा बापाने हातावर तुरीच्या काठीचा फटका दिला. तेव्हापासून बोलताना तो सावधगिरी बाळगू लागला. सगळया कामामध्ये तो आपल्या हातात बॉल असल्यासारखा विचार करायचा. पण केव्हा, जेव्हा तो एकटं असायचा तेव्हा. माणसं असली की त्याला आपसूक कसलं तरी प्रेशर यायचं. दिवसा खेळता येत नाही म्हणून गावातल्या पोरांनी अंडरआर्मसाठी हॅलोजन लावून एक मैदान बनवलं. इकडे दिवसा धड लाइट नसायची आणि रात्री सदैव डीम नाहीतर लोडशेडिंग त्यामुळे ते मैदान तसचं राहिलं. सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम याच्याही गावात नव्यानं बीपीएलचं आयोजन केलं गेलं. फोक्शाला लीगचा अतीव आनंद झाला. आपण या बीपीएल लीगमध्ये काहीतरी करून दाखवूच असं त्याला प्रकर्षाने वाटू लागलं.

फोक्शाचा बापाला एवढा पैसा कशासाठी हवा होता? तो इतकाही बेक्कार नव्हता. तो जास्तच बेक्कार होण्याचं कारणही तसंच आहे. ही गोष्ट बरीच जुनी आहे. त्याच्या मित्राची जमीन निव्वळ नावावर नसल्याने समोरच्याने लाटली. यामुळे तो स्वतःच्या जागेबद्दल धास्तावला आणि जागा झाला. त्याच्या वाटयाला दीड एकर जमीन होती. जमीन होती खरी पण ती होती त्याच्याच कुटुंबातल्या एका माणसाकडे. त्या जमिनीच्या उताऱ्यावर याचं नाव नाही. जमीन वाटणीला आलेली पण नावावर केली गेली नाही. फोक्शाच्या बापाच्या बापाने ती जमीन आपल्या नावावर करण्यासाठीचे काहीच प्रयत्न केले नाहीत. अखेर फोक्शाच्या बापाने प्रयत्न चालू केले तर फोक्शाच्या बापाला तलाठी कार्यालयात चक्कर यायची बाकी राहिली होती.

बाप तलाठी कार्यालयात जाऊन पोहचला.

'जरा या नंबरचा सर्व्हेनंबर दाखवा.'

'थांबा जरा, बसा जरा हे उतारे देतो आणि सांगतो.'

जरा वेळाने त्या मुलाने फोक्शाच्या बापाला आत बोलावले. मौजे बेलकी गावाची खातेवही काढली. त्याच्या काकाचा सातबाराचा उतारा काढला.

तो मुलगा म्हणाला, 'या उताऱ्यावर साडेसहा लाखाचा बोजा आहे.'

साडेसहालाखाचा बोजा? फोक्शाच्या बापाला कळलंच नाही.

'सांग ना यो काय प्रकार आहे.'

'हा कोण खातेधारक आहे? त्याने बँकेकडून लोन घेतले आहे. कर्जासाठी ही जमीन तारण म्हणून ठेवली आहे.'

'ही जमीन आपले नावावं करायची असेल तर काय करावा लागेल?'

'आधी हा बोजा उतरवा. साडे सहा लाख विथ व्याज.'

एवढा पैसा कोंडया काकाने कशासाठी वापरला? कशासाठी एवढे पैसे? कधी याने शानशोकी केली नाय. आंगावर भोकाभोकाच्या बनयान शिवाय हिंडला नाय. कवा पोरींचा लग्न थाटामाटानं लावला नाय. कोन हॉस्पिटलला नवता. साडेसहा लाख क्याजेसाठी काडलं? तलाठी कार्यालय ते घर बापाच्या अंगाची लाहीलाही झाली. ही एवढी जमीन तेवढी आपल्या जवळ आहे. ती गेली तर काय? आपल्या पोरासाठी काय ठेवलयं आपण काही नाही बायकोचं एक मंगळसूत्र आणि दोन कुडया. ते तर त्याच्या बायकोला होतील. पण कोंडया काकाने एवढा पैसा काय केला?

फोक्शाचा बाप घरी वळलाच नाही. थेट कोंडया काकाच्या घरी. तो

घरी नव्हता. बाप शेतावर गेला. कोंडयाका बांधावर माती टाकत होता. बाप चिडून म्हणाला, 'कोंडयाका, साडेसहा लाखाचा बोजा क्याजारं?'

कोंडयाका अतिशय शांतपणे, 'अरं तो आपले गावन पोल्ट्रीवाला कुट्टी निका, तो केरलशा आल्ता. आपले गावन रेयाचा. आमचे घरा जाम वेला येयाचा. तो केंनर कुट्टी आथा फरार हाय. त्याजून यो गोड गोड बोलून कर्ज काडला. तो त्याच्या पोल्ट्रया टाकून आथा गावाला पल्लाय. तू यो बोजा भर ना घे जमीन आपले नावावं.'

झालं. फोक्शाच्या बापाचं मिशन साडेसहा लाख जमवणे सुरू झालं. तेव्हापासून जमीन, पोरींची लग्नं आणि पोरगा सेटल करायचा त्याने विडाच उचलला.

गावात बीपीएलचं वातावरण सुरू झालं.

बसका भाय तुमचा जमीन दलालीचा धंदा तेजीत आहे. च्यायला अवडया जमिनी विकून मोठा दलाल झालास. त्यानं मद्यूस चक्री फिरवतंस त्या वेगल्या. दे वर्गणी दे मजबूत.

सर कुठे कॉलेजला आहात का? टाईम आहे का? सर आपण न भूतो न भविष्यती मॅची भरवतोय. आपल्याकडून भरघोस देणगी पाहिजे. नायतर पहिल्या नंबरची ट्राफी द्या. बस का सर, गावासाठी तुम्ही आजवर काय केलं आहे?

आपलं रेशनिंगचं दुकान छान चाललयं.

विधानसभेला आपली पोरं तुमच्या पाठी.

तुम्ही या गावात जमीन घेतली आहे.

काय ग्रामसेवक भाऊ झालझोल करता जरा मजबूत वर्गणी दया ना.

काका काकी तुमी दोगवा सरकारी नोकरीला. द्या जरा वर्गणी. तुमच्या परिवाराचा फ्लेक्स ग्राउंडभोवती.

आपल्या गावात डिजिटल इंडियाचा प्रचार आणि प्रसार करायला आलेल्या लोकांनी पाच हजार तरी दिलेच पाहिजे.

असं करता करता वर्गणी गोळा झाली.

गावात गावाबाहेर फ्लेक्स लागले. ग्रामीण तरुणांच्या हक्काचं व्यासपीठ. ग्रामीण तरुणांच्या कौशल्याला वाव देणारी लीग. पहिले पारितोषिक रूपये पंचवीस हजार, ट्रॉफी आणि सोळा किलोचा बोकुड प्लस ब्लॅकडॉगचा खंबा. दुसरे पारितोषिक वीस हजार आणि ट्रॉफी आणि दहा कोंबडे. तिसरे पारितोषिक दहा हजार आणि ट्रॉफी आणि तीन किलो पापलेट. ऑरेंज कॅप आणि परपल कॅप. बाकी विविध वीरांना बक्षिस. डीजेची सोय लागली. चारी दिशांना पेंडाल. त्यांना नावं दिली गेली. बांध फोडले गेले. एकदम टकाटक ग्राउंड तयार झाले. संघमालकांनी संघ निवडले. एवढ्याशा गावात आठ संघ तयार झाले. एकाने लगेच्चच गुणाकार केला. अठ्ठयाऐंशी पोरी आणायच्या कुठून? सगळयांना रंगीबेरंगी टीशर्ट आले. सगळी तयारी झाली. मुंबईच्या ऑक्कूड हॉटेलमध्ये काम करणाऱ्या एकाने ब्लॅकडॉगचा खंबा आणला. बोकुड कुठून घ्यायचा असा जेव्हा प्रश्न आला तेव्हा आयोजक फोक्शाच्या बापाकडे आले. त्यांना विराट आवडला. ज्यावेळी विराटचा सौदा झाला तेव्हा फोक्शा तेथे नव्हता. आलेलं कॅश गिऱ्हाईक कशाला सोडा? फोक्शाचा जीवलग विराट विकला गेला.

फोक्शाला जेव्हा हे कळलं की गावातच विराट विकला गेलाय, तेव्हा तो बापावर जाम वैतागला.

'आप्पा विराटला क्या विकलास?'

'धंदेन जनावरावर जीव लावून फायदा नाय.'

'भजी नायतं बुमराचा सौदा करायचा ना.'

'मी नाय ओलखी तुजं भजी ना फजी. त्यांना तोस आवडला. त्याला आपू कवा ना कवा विकनारूस होतू.'

'हा पण आपले गावानूस, बीपीएलवाल्यांनास क्या विकला? आपला ठरलातना गावन एकपन बकरा विकायचा नाय.'

'मस्त भाव दिला त्याईन.'

'अरं पन त्याला कापजल ना.'

'तं बकऱ्या कोन डोकऱ्या होऊन मराया पालतंय का कोन? जा मरखंडाचे खल्यावं तुरीचे शिंगांचा भुकट घेऊन ये.'

फोक्शा मरखंडांच्या खल्यावर निघाला. ज्याच्यावर खूप जीव लावला तो विराट शुभ्र अंगाचा, त्याच्या अंगावर काभऱ्या रंगांचे छोटे मोठे चट्टे होते त्यामुळे तो छान दिसायचा. त्याचे कान छानसे लांब आणि मोठे होते. त्यांच्या शिंगाही टोकदार होत्या. सगळया बकऱ्यांमधला तो आकर्षक बोकुड होता. त्याला आणल्यापासून फोक्शाची आणि त्याची मैत्री झाली. त्याचं त्यानं संगोपन केलं. फोक्शा त्याच्याशी बोलायचा. त्याला सगळयात भारी वाटायचं ते म्हणजे विराट त्याला काहीच उलट बोलायचा नाही. तोही विराटवर चिडायचा नाही. फक्त वे बेए फोक्शाला वाईट वाटलं. आपण जे बीपीएलचे सामने खेळणार आहे. त्याच्या फायनलचं बक्षिस आपण वाढविलेला बोकुडच आहे. शेतावर जाता त्याने ठरविलं की आपण जर फायनल जिंकलो तर त्या पार्टीत सहभागी व्हायचं नाही. कारण त्या पार्टीत विराटचं मटण असेल.

गावात एक आठवडयात तीन दिवसात मॅची खेळवल्या गेल्या. कॉमेंट्रीच्या मागोमाग काही उपकॉमेंट्री दिल्या गेल्या.

कॉमेंट्री : हा नव्या दमाचा नव्या जोमाचा खेळाडू कम्प्टर माश्टर अनेक कंपन्यामधल्या जॉबवर लात मारून केवळ आणि केवळ क्रिकेटच्या प्रेमापोटी त्याने आपल्या हमदाबाद हायवेच्या टोलनाक्यावर नोकरी पत्करली आहे. तो टोलनाक्यावर असल्याने त्याला त्याचे मित्र तिकडून उचलतात. बघुया तो आपल्या संघासाठी काय करतोय संघाची दयनीय अवस्था झाली आहे.

उपकॉमेंट्री : एकेस कंपनीन काम करता तं आथा मॅनेजर झाला असता.

कॉमेंट्री : आता सातव्या स्थानावर येतोय आपल्या पहिल्या वहिल्या बीपीएल सीझन मधील मोश्ट स्टायलिश्ट प्लेयर. आपल्या केसांना वेण्यांना घालून त्यांना चांगलेच रंगवून उत्कृष्ट असे प्रदर्शन मांडले आहे पंचक्रोशीत हा आपल्या केसांकरिता गाजलेला खेळाडू आहे. आपल्या स्टेजवर आलेले आहेत आपल्या पक्षाकरिता आपलं आयुक्श खर्ची घातलेले माननीय भगवान भाऊ. आपल्या पंतप्रधानांच्या सारखे कोटी घालणे यांना खूप आवडतं.

कॉमेंटस् : च्यायचा एकेस रंगांची कोटी किती वेला घालील? याजून घराचे पडदयांच्यापन कोटया शिवल्या. पन्तपरधानाचा काय जातंय. तो क्या ना यो क्या. तो मोदी ना यो निस्ता बाता चोदी.

उपकॉमेंट्री : हा एक नालायक शॉटओह ओह येडझवा शॉट. लवड्या मार, ब्याट काय हमकाया दिलेय काय हातन.... मार.

कॉमेंट्री : कृपया वेवस्थापकांनी बक-याला बोरीचा पाला आणण्याची सोय करावी. तो बक-याला घालावा. बक-याचं वजन घटलं तर विजयी टीम दावा ठोकू शकतेहाहाहा

कॉमेंटस् : आज माईकची वरची जाली झिजणार. एक वर्षाचा कोठा फुल. किती बोलतयं यो.

कॉमेंट्री : माननीयआपल्या शेतीत फारसे पीक येत नाही तरी बांध फोडले म्हणून आपला धंदा तेजीत नसताना जेसीबी दिला म्हणून सरकारने परमीट बंद करून अनेक ट्रका धूळखात पडल्या असताना देखील एक ट्रक माती दिली म्हणून मणपूर्वक आभार.

उपकॉमेंट्री : मॅची खपल्यावं सोमाऱ्या काकाला पैशे दया. नायतं सोमाऱ्या काका तुमाना शाप देऊन तुमचा भुक्का वालील.

कॉमेंट्री : जर कोनी बाईंनी अक्काताईंनी मायमावशीने बॉन्ड्री बाहेर कॅच पकडला तर तिला रोख दहा हजार रूपयांचा रोख बक्षिस बघुया कोन हे बक्षिस जिंकते ते हवेतर ओढण्या अथवा साडी लुगडयाचा पदर पसरला तरी चालेल.


या सामन्यांमध्ये मधल्या वेळेत व्यासपीठावर जाऊन अनेक लोकांनी भाषणे दिली. अशा तर्हेचे सामने भरवणे हे एक मोठे समाज कार्य आहे उदया काय सांगता येते आपल्या गावातील मुलं आंतरराष्ट्रीय मॅचींमध्ये खेळतील आज आपल्या देशाला खेळणाऱ्या तरूणांची आवश्यकता आहे जशी मोदीजींनी नोटाबंदीचे आयोजन केले आहे तसेच आज आपल्या गावात धाडसी निर्णय घेऊन खेळांचे आयोजन केले आहे. आपले गावन जायाचं रस्तं खराब हान त्या सगला पटतयं माना. पन आपल्याना आथा भारत मातेच्या मंदिराची गरज हाय. तो बांदल्याशिवाय आपू स्वस्त बसायचा नाय. इंजिनाने प्रेरित झालेल्या एकाने मराठी मुलं खेळलीच पाहिजेत असा संबंध जोडला. याहूनही भव्य मॅची भरवू. या आठवडया दरम्यान गावच्या व्हॉट्सप ग्रुपवर बातमी झळकली. ती एका शिक्षक पत्रकारानं लिहिली होती. 'क्रिकेटच्या मागे ग्रामीण पोरं बर्बाद'. ग्रुपवर मूक सन्नाटा. कुणाचंच काही रिप्लाय नाही. एका दोघांनी पटल्याचे अंगठे दाखविले. एक दोघांनी न पटल्याचे. वर्मावर घाव घातल्याने आतून सगळे चवताळले. हजार चांगल्या गोष्टी किवंड वायच्या असतील तर एक वाईट गोष्ट शोधून काढा आणि ती सगळीकडे पसरवा या वर्तमान नीतीचा परिणाम खालपर्यंत पोहोचला आहेच. त्यांनी त्या शिक्षकाचा एका मॅचचं उद्‌घाटन करतानाचा फोटो शोधून काढलाच. मग त्याच्या शिक्षणाची त्याच्या शिक्षकी पेशाची चढत्या क्रमाने समीक्षा झाली.

रूपेरी वाळू सोनेरी लाटा त्यावर माजा मन गं जडतयं खली बली हो गया है दिल तारवार दिलके सब तुट जो गए जवा बगतीस तू माझ्याकडं मला आमदार झाल्यासारखं वाटतयं जरा जपून दांडा धर जरा जपून दांडा धर शांताबाईशांताबाई अपना टाइम आयेगाशब्दोंका ज्वाला मेरी बेडिया पिगलाएगाजितना तुने बोया है उतना तू खाएगा. डहाणू गावालाडहाणू गावाला चिअर्स गर्लची जागा सोनावकर जावयाने भरून काढली. लग्नाच्या मांडवातला ओपनर डान्सर. त्यामुळे बीपीएल सदस्याने त्याला सकाळीच धरून क्वाटर पाजली.

कोणाला विकत घ्यायचं अशी खलबलंही झाली. एक दोन संघांने सेटिंग केलीही. पोलार्ड आणि फोक्शाची भेट झाली. याची त्याला त्याची याला करता फोक्शाचा संघ फायनलला पोहचला. समोर पोलार्डचा संघ होता. हा अतीतटीचा सामना. शेवटच्या ओव्हरला पोलार्ड आणि फोक्शाचीच झुंज. एका बॉल मध्ये तीन रन पाहिजे होत्या. लोकांचा दोघांवरही विश्वास. थोडासा अंधार होत चालला होता. फोक्शाच्या हातात चेंडू. 'आपल्या नावावरचा फोक्शा यो शिक्का काडायची यीस ती वेल. आपून जर मॅच जिकवली तर आपन मॅचविनर फोक्शा. जिकलू तरी विराटचा मटण खायाचा नय. पण जांघेतल्या गोचडीचे काय... फोक्शाने तो बॉल टाकला आणि अंम्पायर जोराने ओरडला. 'नो बॉल.' पोलार्डही जरा गोंधळला. पोलार्डचा नाइलाज होता. तो फटका टोलावला आणि धावून दोन रन काढल्या. फोक्शाची गावदेवी टीम हरली.

उपविजेता संघ तरीही पार्टी होतीच. एकतर नोबॉल पडलाय, त्यामुळे माजल्यावर एक दोघं तरी आपल्याला फाडून खातील, असं फोक्शाला पक्क माहीत होतं. इकडे पोलार्डला विजयाचं काही वाटलं नाही. त्याच्या मित्राचा नोबॉल पडला होता याचं त्याला दुःख झालं. ते दोघेही तिकडे गेलेच नाहीत. तिकडे नाचण्याचे आणि जोराजोरात आरोळया ठोकण्याचे आवाज येत होते. ते मोठयामोठयाने फोक्शा फोक्शा असं ओरडताहेत असा त्याला भास झाला. रस्त्यात त्याला लोकं गाण्यातून प्रश्न विचारताहेत.

फोक्शा पोरा फोक्शा पोरा क्या गेल्तास?
किरकेट खेलाया



किरकेट खेलून कोन होनार?
पॅकपॅकपॅकर्स...
पॅकर होऊन काय करणार?
पैशे कमावणार...
पैशे कोनाला?
बापासलाबयन्यांचे लग्नाला...
फोक्शाभाऊ फोक्शाभाऊ आथा कुठे चाललात?
बकऱ्या वालायला
बकऱ्या वालून काय करणार?
पैसे कमावणार
पैसे कोणाला?
बापासलाबयन्यांचे लग्नाला... ते कोंडयाचे उता-याचे बोज्याला...

फोक्शा रानाकडे निघाला. भर रानात एक फुटका बंधारा होता. तो बंधाऱ्याच्या चौथऱ्यावर जाऊन बसला. पोलार्ड आणि त्याची ती बसायची नेहमीची जागा होती. तिथं लपवलेल्या मेणबत्या त्याने काढल्या. पहिल्या झटकयात त्याला ती डकवता आली नाही. त्यानं अतिशय शांत डोक्यानं ती डकवायचा प्रयत्न केला. पण तरीही ती पडलीच. मग अखेर पेटली. किर्र काळोखाचा तेवढाच भाग उजळून निघाला. फोक्शा पोलार्डची वाट पाहू लागला. पोलार्ड आला. त्याने येताना त्याच्या वाटणीचा ब्लॅकडॉगचा पेग आणला होता आणि स्वतःसाठी इंम्पिलीयर ब्ल्यूचा खंबाही आणला होता. तिकडे बेंन्जो



आणि डीजेचे आवाज येऊ लागले होतेच. आज फोक्शा पिणार हे पोलार्डला माहीत होतं. ब्ल्यूचे प्लास्टिक ग्लास भरले. या कचकड्याच्या ग्लासला ग्रीप न आल्याने तो अजून वैतागला. फोक्शाने एका दमात दोन तीन ग्लास रिकामे केले. फोक्शा तंतरला, सगळं गरगर फिरायला लागलं. त्याच्या डोक्याडोळ्यातून गुगली पडायला लागले. त्रिफळा उडालेले स्टम्प दिसायला लागले. नुसतेच कॅच उडताना दिसायला लागले. बाप अंम्पायर दिसायला लागले. सगळे फोक्शा फोक्शा असं चिअरअप करण्याचे आवाज त्याच्या कानात घुमू लागले. हाय फोक्शा बे बे. विराटचा बे बे. त्याच्या गळयाभोवती सुरी. खाटिकाने त्याची चामडी वेगळी करण्यासाठी हाताची मूठ आवळली आहे. फोक्शाचा आवाज थोडा चढला होता. स्वतःच बडबडू लागला,

होशी तू सेटल तं तुला काय भेटल.
होशी तू सेटल तं तुला बापासचा प्रेम भेटल.
होनार नाय सेटल तं तुला पोरगी कशी खेटल

आता तो पोलार्ड बरोबर बोलू लागला.

'पोल्या तुजेजवळ तुजी बायको नाय, माजे जवल माजी आय नाय. दोन बयनी बिनलग्नाच्या. ना मी बक-या चराया ना तू पॅकर्स झालास ना मी झालू. चल बॅक टू पॅव्हिलियन.'

'माजे बापासचे डोखेन सेटलचा स्टंब कोणी गाडला सांग.'

पोलार्डला चढली नव्हती त्यामुळे तो जास्त बोलत नव्हता. फोक्शाला साथ दयायची म्हणून तो बोलला, 'हा फोक्शा, सौंसारंन माना छक्कं मारतास नाय आलं, गेली सोडून. आपला बाप पत्तं खेलून मेला. त्याचं गुन आपलेन उतरलेन. सारखा वाटायचा ओपन रमीन आपले जवल मास्टर कार्ड असला पायजे. किलो खेलताना आपल्याला हॅन्ड गेम यावी असा ज्याम वाटतयं. एके संस्थेन कामाला लागलूत पन पगार किती सहा हजार. आपले जवल जाम पैशे असाया पायजे होतं. आपून मोठे रोनंन बसलू असतू शंभर रूपये पॉइंट. ज्याम पैशे जिकून मंग पत्तं सोडून दिलं असतं. पन ती आपले चिचंखालची शाला माना परत परत खेलाया बोलावतयं.'

'तुजी आया तुजेसाठी फार करतयं रं एक दिवस मी पायला तिची कंबर दुखतंय तरी ती शेतंन पिड्यावर बसून कापनी करीत होती. गोल्या खायाला पैशे नाय म्हनून एक गोली तीन दिवसन खातंय. पोल्या आसचे फोटोकडं पावून पावून आसचे प्रेमाची भूक थोडी भरतयं.'

'काय समजस नाय क्य जायाचा. बापूस बरोबर का आपून बरोबर. यो खेल बरोबर का ये धंदं बरोबर. बापासचा पन नो बॉल पडला का. त्याजी बायको अचानक गेली ना तीन पोरा आंगावं पडली. त्यान तो झाला असंल चिडचिडा. माना सेटल कराया अवडा तलंमलं करतयं. आयुष्यनं प्रत्येकाचा नो बॉल पडतयं का? ते नो बॉल मननचे मनन मानूस लपवून ठेवतयं का?

रात्र चढत गेली. तारेचा जोरदार करंट लागून राहून तसा फोक्शाचा मेंदू बधीर झाला होता. त्याला पोलार्ड अंधुक अंधुक दिसत होता.

'चल आपू परत जाव आपले आसबापासकडं त्यांना जग समजून घेव. तू तुजे आसचा बायकोसचा विचार कर मी माजे बासचा विचार करताव.'

फोक्शा अचानक उठला आणि निघाला. पोलार्ड म्हणाला. 'सांबालून पाय टाक.'

'हो च्यासला नो बॉल पडाया नको.'

फोक्शा अंधार चाचपडत बांध खासरं पार करीत मचाणीपर्यंत गेला आणि धाय मोकलून रडू लागला. बसलेल्या बकऱ्या धडाधड उठल्या. तो बकऱ्यांना गोंजारू लागला. आज त्याचे बकऱ्यांना ओळखताना अंदाज चुकत होते.

'ये भजी सांगना माझा नो बॉल क्या पडला? ये बुमरा तुजा नो बॉल पडला होता तेव्हा तुला कसा वाटला होता त्या सांग ना? सांग ना माझा नो बॉल क्या पडला? अंम्पायरने चिटींग तं नाय ना केली? माज्यावं आरोप होल रं विकला गेल्याचा. तुमच्या आयला तुमचा बरा हाय तुमचा लगीन बिगीन होय नी. जाडजूड मातला का पाठवला खाटकाकडं, गेम खल्लास. आपला विराट गेला.'

मी काय खरास फोक्शा हाव का? आ सांगा ना. पोलार्डनी साडेतीनशे धावा काडल्या ना मीन बावीस विकेट काडलं ते काय उपेगाचं नाय. लगीन केला तं माजा पोलार्डसारखा तं नाय ना होयाचा? पोलार्डला तं ज्याम ताकद हाय आपन तं फोक्शा... फोक्शा... आइं मेली तवास माजा नो बॉल पडला होता का? ते नो बॉलची आथा आपून आपले बापासला साथ देणार किरकेट गेला फोक्शा मचाणीतून बाहेर आला आणि बाहेरच्या झोल पडलेल्या खाटेवर झोपला. बकऱ्या बऽऽऽ फ्रूसकरीत राहिल्या.

बाप तो बापच. तो मचाणीजवळ आला. फोक्शाला खांदाडी घालून तो त्याला घराकडे घेऊन जाऊ लागला. त्याने जोरात एक शिवी मारली कुट्टीच्या कोंडयाच्या आणि क्रिकेटच्या

तिकडे पोलार्ड अजून बंधाऱ्यावरच पडला होता. त्याचं अंथरूण करून त्याची आई वाट पाहात भिंतीजवळ कलडंली होती.

संपर्क - vivekkudu@gmail.com